लेख --} http://wp.me/pzBjo-DW

अमृतमंथन --} http://amrutmanthan.wordpress.com/

*प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात एक काळ असा येतो की, त्यावेळी जनतेचं वास्तवाचं भान सुटतं आणि ती गुलाबी आभासालाच वास्तव मानू लागते. समाजमनाला एकूणच ग्लानी येते. जनतेचं हे असं वास्तवाचं भान सुटावं अशी प्रत्येक राज्यकर्त्यांचीच इच्छा असते. अशा काळात करमणुकीला अतोनात महत्त्व येतं. कला आणि करमणूक यातील भेद कळायची कुवतही समाज हरवून बसतो.*

## अन्यथा... : उत्सवी मग्न राजा.. आणि प्रजाही!

**लोकसत्ता, शनिवार, ९ एप्रिल २०११**
**गिरीश कुबेर,**

girish.kuber@expressindia.com



प्रसंग लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या संदर्भातला आहे. ते आणि पं. नेहरू दिल्लीच्या रस्त्यावरून एकदा जात होते. आता पं. नेहरू होते म्हणजे एडविना माऊंटबॅटनही बरोबर असू शकतील, पण मुद्दा अर्थातच तो नाही. दिल्लीच्या रस्त्यावरून जात असताना समोरून एक भली मोठी लग्नाची मिरवणूक जात होती. दिल्लीवाले कोणतीही गोष्ट जरा जास्तच जोरात करतात. तसंच ते लग्नाचंही असणार. लाल रंगातले बँडवाले, डोक्यावरनं बत्ती घेऊन चालणाऱ्या बाया. ते नाचणं वगैरे असं सगळंच असणार. ते पाहून लॉर्ड माऊंटबॅटन पंडितजींना म्हणाले, तुम्ही भारतीय कसले कसले उत्सव करता.. लग्न.. बारसं.. काहीना काही सुरूच असतं. त्यावर पंडितजींचं उत्तर होतं, या सगळय़ांच्या आयुष्यात इतकं दु:ख आहे की, त्यातून विरंगुळा म्हणून हे सगळय़ाचा असा उत्सव करतात..

गेल्या आठवडय़ात क्रिकेट विश्वचषकाचा न संपणारा आनंदसोहळा पाहात असताना पं. नेहरूंचं हे उत्तर आठवत होतं. आता भारताला साध्य करण्यासारखं जगात काहीच राहिलेलं नाही.. ते एकदा सचिनचं भारतरत्नचं करून टाकलं की झालं.. अशा भावनेनं सारा देशच भारावलेला होता. लहानथोर सगळेच कानात वारं गेल्यासारखं करत होते. एरवी सोनिया गांधी तशा स्वत:चा आब राखून असतात, पण विश्वचषक जिंकला आणि त्यांनाही इतरांसारखं वागावंसं वाटलं. उघडय़ा गाडीतून तिरंगा घेऊन दिल्लीच्या रस्त्यावरनं त्या भटकून आल्या. पंतप्रधान सिंग, 'भावी' पंतप्रधान राहुल गांधी, न झालेले भावी पंतप्रधान लालकृष्ण अडवाणी.. यांच्यापासून ते गल्लीतल्या नगरसेवकांपर्यंत सगळय़ांत जणू चढाओढच लागली होती. देश

महासत्ता बनल्याची खात्रीच पटली ते पाहून.

पण मुळात जेमतेम दहा देशांतल्या खेळातल्या विजेत्याला विश्वविजेता मानावं का, हा पहिला प्रश्न. तो विचारणं या क्षणी पाप आहे याची जाणीव आहे, तरीही तो विचारायलाच हवा. देशानं आता एवढय़ातल्या एवढय़ात विश्वनाथन आनंदसारखा खराखुरा जगज्जेता पाहिलेला आहे. तो जेव्हा दुसऱ्यांदा विश्वविजेता बनून आला तेव्हा त्याच्या स्वागतालासुद्धा विमानतळावर कोणी गेलं नाही. याचं कारण साधं आहे. कोणतीही बहुराष्ट्रीय कंपनी विश्वनाथन आनंद याची पुरस्कर्ती नाही.. त्यामुळे टीव्हीवर आणि वर्तमानपत्रात जाहिराती नाहीत. त्या नाहीत म्हणून त्याच्या बाबत हवाच नाही. म्हणजे तो कोणाच्या उत्पादनांची जाहिरात करत नसल्यानं त्याच्या यशाची उंचीच आपल्याला कळणार नाही. म्हणजे आपण काय कळून घ्यावं याचा निर्णय या कंपन्या करणार.. बाजारपेठीय शक्तींच्या हाती आपण काय काय देणार..

आता विश्वचषक जिंकल्यावर कर्णधार महेंद्रसिंग धोनी याच्या हाताला कसा जादुईस्पर्श आहे. तो हात लावेल त्याचं सोनं कसं करतो.. झहीर खानच्या गोलंदाजीत कशी जादू आहे. यावर रकानेच्या रकाने लिहिले गेले आणि टीव्हीवरनं या सगळय़ांच्या आरत्याच ओवाळणं बाकी होतं. पण याच महेंद्रसिंग धोनी याच्या घरावर २००७ सालच्या विश्वचषक स्पर्धेतल्या पराभवानंतर आपल्याच लोकांनी दगडफेक केली होती. त्याच्या आईवडिलांना जीव मुठीत धरून राहावं लागत होतं. झहीर खान याच्या हॉटेलचं नुकसान केलं होतं. आता तोच धोनी आणि तेच आपण तो मॅनेजमेंट गुरू म्हणून कसा उत्तम आहे, याचे गोडवे गातोय. मॅनेजमेंट गुरू हे एक नवीनच प्रकरण असतं हल्ली. पाचेक वर्षांपूर्वी आपलं रेल्वे खातं चांगलं चालविल्या बद्दल लालुप्रसाद यादव हेसुद्धा असेच मॅनेजमेंट गुरू वगैरे झाले होते. भाषणही द्यायला जायचे ते वेगवेगळय़ा मॅनेजमेंट कॉलेजांतून. नंतर ममता बॅनर्जी रेल्वेमंत्री झाल्या आणि त्यांनी सांगून टाकलं लालूंनी रेल्वेची कशी वाट लावलीये ते. आता ते मॅनेजमेंट गुरू वगैरेचं काय होणार ते कळलं नाही. असो.

प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात एक काळ असा येतो की, त्यावेळी जनतेचं वास्तवाचं भान सुटतं आणि ती गुलाबी आभासालाच वास्तव मानू लागते. समाजमनाला एकूणच ग्लानी येते. जनतेचं हे असं वास्तवाचं भान सुटावं अशी प्रत्येक राज्यकर्त्यांचीच इच्छा असते. अशा काळात करमणुकीला अतोनात महत्त्व येतं. कला आणि करमणूक यातील भेद कळायची कुवतही समाज हरवून बसतो.

आपली समस्या ही आहे की आपल्या नशिबात हे असे कालखंड वारंवारच येतात. त्यासाठी आपले राज्यकर्ते आपले आभारच मानत असतील, मनातल्या मनात. उत्तर पेशवाईत जेव्हा दिवाळं वाजायची वेळ आली होती तेव्हाच बावन्नखणी छनछनाट जोरात सुरू होता. एवढय़ा जुन्या इतिहासात डोकावयाची गरज नाही. दोन दशकांअलिकडची परिस्थिती आठवली तरी हे कळेल. ३१ ऑक्टोबर १९८४ला इंदिरा गांधी यांची हत्या झाली आणि देशाचं राजकारण आणि त्यामुळे अर्थकारणही ढवळून निघालेलं होतं. अजस्र बहुमतानं निवडून आलेले राजीव गांधी

पंतप्रधानपदी होते. त्यांच्या विज्ञान तंत्रविषयक धोरणांची मध्यमवर्गाला भुरळच पडली होती. पण फ्रेंच महोत्सव, रशियन महोत्सव वगैरे थोतांडं त्यांच्याच काळातली. त्यांच्या पहिल्या सत्ताकाळाच्या उत्तरार्धात भ्रष्टाचारांची मोठमोठी.. खरीखोटी.. प्रकरणं उघडकीस येऊ लागली होती. अर्थमंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यांनी धीरुभाई अंबानी, शंतनुराव किलरेस्कर आदींवर धाडी घालायचा सपाटाच लावला होता. नंतर नंतर तर त्यांनी राजीव गांधी यांनाच आव्हान द्यायला सुरुवात केली होती. बोफोर्सच्या तोफा धडाडू लागल्या होत्या. राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग हे काय करणार याकडे सगळ्यांचं लक्ष होतं. एकवेळ तर अशी आली की, झैलसिंग हे स्वत:च सरकारचंच उच्चाटन करतायत की काय. अनेकांना त्यामुळे एकदम आणीबाणीचीच आठवण येत होती. देश कमालीच्या अस्थिरतेच्या वातावरणात होता.

नेमक्या याच काळात जनताजनार्दन वगैरे म्हणतात तो रविवारी सकाळी आंघोळ करून रामायण मालिकेत गुंतलेला होता. अनेक ठिकाणी तर रामाचं टीव्हीच्या पडद्यावर दर्शन झाल्यावर सियावर रामचंद्र की जयचा जयघोष व्हायचा आणि टीव्हीलाच हारफुलं वाहिली जायची. शक्य झालं असतं तर लोकांनी त्यावेळी टीव्हीलाही आंघोळ घातली असती. रविवारी रस्त्यावर शुकशुकाट असायचा आणि नंतर पुढच्या रविवापर्यंत लोक मागच्या रविवारच्या रामायणातली कथा एकमेकांना ऐकवत बसायचे. याच काळात राजीव गांधींनी हाकलल्यानंतर विश्वनाथ प्रताप सिंग अलाहाबादेतनं पोटनिवडणुकीत विजयी झाले. पुढच्याच वर्षी, १९८९ साली, लोकसभेच्या निवडणुका होत्या. तेव्हा रामायणाची जागा महाभारतानं घेतली होती. १९८७ ते ८८ या काळात रामायण मालिका सुरू होती आणि १९८८ ते १९९० दोन वर्षे महाभारत. हा काळ देशासाठी अत्यंत खडतर होता. सोनं गहाण ठेवायची परिस्थिती याच काळात निर्माण होत गेली आणि देशाच्या राजकारणाला नवं वळण देणारी बाबरी मशीद.. रामजन्मभूमी आंदोलनही याच काळात आकाराला येऊ लागलं. क्रिकेट विश्वचषक विजय आणि त्यानंतरच्या उन्मादाच्या निमित्तानं हे सगळं तपासून पाहणं आवश्यक आहे. गेले काही महिने देशातील जनता अगदी पिचून गेली होती. दूरसंचार घोटाळ्यातले ए. राजा, पुणा महोत्सववाले राष्ट्रकुल घोटाळ्यातले सुरेश कलमाडी, दक्षता आयोगाने हतबल झालेले खुद्द पंतप्रधान मनमोहन सिंग.. वाढती महागाई.. या सगळ्या वातावरणात विश्वचषकानं एक उभारी दिली हे खरंय, पण ही उभारी किती मजबूत मानायची आणि मुळात असल्या कचकड्याच्या आनंदानं इतकं हुरळून जावं का? आपली पंचाईत अशी आहे की आपल्या राज्यकर्त्यांनाही या प्रश्नाची उत्तरं एकतर देता तरी येत नाहीयेत किंवा खरोखरच माहीत नाहीयेत. अशा वेळी तेच शिंग मोडून वासरांत शिरतात आणि दाहक वास्तवापासून चार घटका विरंगुळा शोधताना दिवस दिवस सामने बघत बसतात. एका बाजूला याच सरकारचे अर्थसल्लागार, सर्वोच्च न्यायालय आपल्याला सांगतं की, देशात गरिबांची संख्या दाखवली जाते त्यापेक्षा अधिक आहे आणि दिवसाला फक्त १२ रुपये एवढा मोबदलाही त्यांना मिळू शकत नाही. त्याच वेळी हेच सरकार अब्जावधी रुपयांचा दौलतजादा क्रिकेटपटूंवर करतं, तेव्हा त्याचं समर्थन असं काय करायचं? देशातल्या प्रकल्पांसाठी आपल्या जमिनी गमावून बसणाऱ्या अनेकांना सरकारकडून जमिनीच्या तुकड्याची देण्यात

आलेली आश्वासनं पूर्ण झालेली नाहीत. अनेक जवानांच्या विधवा पत्नी, वृद्ध पालक त्यांना जाहीर झालेल्या जमिनीच्या, पेट्रोलपंपांच्या प्रतीक्षेत आहेत. अशा वेळी या क्रिकेटपटूंना भूखंडच्या भूखंड देण्याच्या सरकारांच्या घोषणेचं काय करायचं? आणि सरकारच्या म्हणण्यानुसार हे क्रिकेटपटू देशासाठी खेळत नाहीत, तर बोर्ड ऑफ क्रिकेट कंट्रोल ऑफ इंडिया या कंपनी कायद्यानं नोंदणीकृत असलेल्या कंपनीसाठी खेळतात. त्यात असं सगळय़ांनीच वाहून जात राहणं देश म्हणून कितपत योग्य?

अशा वेळी आवर्जून दाखला द्यावासा वाटतो तो रोमन साम्राज्याचा. मानवी संस्कृतीच्या इतिहासात या साम्राज्याची झळाळती कामगिरी हा अनेकांच्या अभ्यासाचा विषय राहिलेला आहे. किंबहुना या साम्राज्याचा उदयास्त समजून सांगणारा एडवर्ड गिबन यांचा ग्रंथ वाचणं हीसुद्धा एक कामगिरीच मानली जाते. तर जेव्हा या राजवटीला तडे जायला लागले आणि एकेक वीट ढासळू लागली त्यावेळी राजानं काय केलं? तर गावोगाव सर्कशीचे खेळ लावले आणि लोकांना आमंत्रणं दिली. बघा.. ही सर्कस बघून मनोरंजन करून घ्या.. पण दु:ख करू नका..

आता राजा नसेल.. साम्राज्यही नसेल, पण कोणी म्हणेल आयपीएल म्हणजे सर्कस नव्हे!

http://www.loksatta.com/index.php?option=com_content&view=article&id=148510:2011-04-08-17-12-19&catid=323:2011-01-11-12-20-33&Itemid=324

❑ ❑ ❑